**वादीचा उलट तपास प्रतिवादी क्र.१ र्फे उलट तपास विधिज्ञ श्री. बी.एम. दळवी यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१३. माझी जन्म दि.२३/०६/१९७६ रोजी झाला. माझे शिक्षण दहावी पर्यंत गावी झाले आहे. हे खरे की, महीपत येसु राणे यांचे मुलगे मधुकर, सिध्दु व गजानन आहेत. मधुकर हे गावी शेती करत होते किंवा कसे ते मला माहीत नाही. साक्षीदार सांगतो की, ते दुसऱ्याकडून शेती करुन घेत होते. ते प्रभाकर राणे व एकनाथ राणे यांच्याकडून शेती करुन घेत होते. हे खरे की, सिध्दु मुंबईत कामाला होते. हे खरे की, महिपतचा मुलगा गजानन हे देखील बीपीटी मध्ये कामाला होते. मधुकर कधी मयत झाले ते मी सांगू शकत नाही. हे खरे की, प्रतिवादी हा मधुकरचा मुलगा आहे. हे खरे नाही की, प्रतिवादी मंगेश हे गावी शेती करतात. मी दावा दाखल करताना सर्व माहिती वकिलांना दिली होती. हे खरे नाही की, मी दाव्यात मंगेश यांचा व्यवसाय शेती असा लिहीला होता. मी दावा पुर्ण वाचला आहे. हे खरे की, दाव्यात मंगेश यांचा व्यवसाय शेती असे लिहीले आहे. हे खरे की,प्रतिवादी क्र.१ चा व्यवसाय शेती आहे. हे खरे की, दावा मिळकत महिपत यांची होती. हे खरे नाही की, ही मिळकत यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या तीन मुलांच्या नावे वारसाहक्काने आली. हे खरे नाही की, महीपत स्वतः शेती करत होते व त्यांचा मुलगा मधुकर त्यांना मदत करत होता. दावा मिळकतीत महीपत स्वतः शेती करत होते व त्यांचा मुलगा मधुकर त्यांना मदत करत होता किंवा कसे हे मला माहीत नाही.

१४. फेरफार क्र.३३७९ ची माहीती प्रतिवादीला नव्हती किंवा कसे हे मला माहीती नाही. हे खरे की,मला देखील या फेरफारची माहिती नव्हती.फेरफार क्र.३३७९ ची नोटीस प्रतिवादीला काढली होती किंवा नव्हती हे मला माहीती नाही. फेरफार क्र.३३७९ ची कोणतीही चौकशी झाली होती किंवा कसे हे मला माहीती नाही. फेरफार क्र.३३७९ अन्वये वादीने त्याचे नाव बेकायदेशीरपणे नोंदवले होते किंवा कसे हे मला माहीती नाही. फेरफार क्र.३३७९ चे निकालाच्या विरोधात प्रतिवादी क्र.१ ने आर.टी.एस.अपील नं.७०/२०१४ दाखल केले होते किंवा कसे ते मला माहीत नाही. या अपीलाचा निकाल होऊन फेरफार क्र.३३७९ रद्द झाला किंवा कसे हे मला माहीत नाही. हे खरे की, आर.टी.एस.अपील नं.७०/२०१४च्या निकालाविरुध्द माझ्या वडिलांनी अपील केले नाही. उपविभागीय अधिकारी, कणकवली यांनी दावा मिळकतीला माझ्या वडिलांनी बेकायदेशीरपणे नाव लावून घेतले म्हणून फेरफार रद्द केला

किंवा कसे ते मला माहीत नाही. फेरफार क्र.३३७९ ची परत चौकशी करावी असा आदेश दि.२७/१०/२०१५ रोजी केला होता किंवा कसे हे मला माहीत नाही. हे खरे की, सन २०१५ पासून मी या फेरफार रद्दची चौकशी व्हावी याबाबत अर्ज केलेला नाही.हे खरे नाही की, माझ्या वडिलांनी फेरफारला नाव लावून घेतलेले बेकायदेशीर होते. दावा मिळकतीचे मालक महीपत यांनी माझ्या वडिलांचे नावे केव्हाही कसलेही मृत्युपत्र केले नव्हते किंवा कसे ते मला माहीत नाही. दि.१५/१०/१९९० रोजी महीपत यांनी माझ्या वडिलांचे नावे मृत्यूपत्र करुन ठेवले होते किंवा कसे ते मला माहीत नाही. असे कोणतेही मृत्यूपत्र महीपत यांनी माझ्या वडिलांचे नावे करुन ठेवले नसल्यामुळेच याकामी ते दाखल नाही किंवा कसे ते मला माहीत नाही. माझ्या सरतपासातील मजकूर सदर मृत्यूपत्राचा दस्त दुय्यम निबंधक, कणकवली यांचे कार्यालयात नोंदणी क्र.२१३६/१९९० ने नोंदवला होता हा मजकूर खोटा आहे किंवा कसे ते मला माहीत नाही. हे खरे नाही की, दुय्यम निबंधक, कणकवली यांचे कार्यालयातुन सदरच्या दस्ताची नक्कल याकामी दाखल केली आहे हे मी खोटे लिहीले आहे.

१५. हे खरे की,सरतपासातील परिच्छेद नं.९ मध्ये उल्लेख केलेले राघोजी गंगाराम राणे हे वादीचे सख्खे भाऊ व माझे सख्खे चुलते आहेत. परशुराम धर्माजी कांबळे यांची चौकशी केली परंतु ते मिळू शकले नाही हा सरतपासातील मजकुर चुकिचा आहे किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. राघोजी गंगाराम राणे , बाळकृष्ण विष्णु जोशी हे मृत्यूपत्रावरील साक्षीदार होते हे मी खोटे सांगतो किंवा कसे हे मला माहीती नाही. परशुराम धर्माजी कांबळे यांनी ओळख घातली होती हा मजकूर चुकीचा आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. दावा मिळकतीचे मूळ मालक महीपत राणे हे सुशिक्षीतहोते व ते सहावी शिकले होते किंवा कसे हे मला माहीत नाही. महीपत राणे सही करत होते किंवा कसे हे मला माहीत नाही. सरतपासातील परिच्छेद नं.१० मध्ये महीपत राणे यांना उतारवयात त्यांच्या हातास कंपवात झाला होता हे वाक्य माझ्या दाव्यात आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. सरतपासातील हे वाक्य खोटे आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. महीपत राणे हे बाळकृष्ण राणे यांचे चुलत पुतणे होते हे दाखवणारा कोणता कागद याकामी दाखल नाही किंवा कसे हे मला माहीत नाही. महीपत राणे यांचा बाळकृष्ण राणे हे चुलता पुतण्या होता हे मी खोटे सांगत आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. हे खरे नाही की, महीपत राणे यांच्या उतारवयात माझे वडील त्यांची देखभाल करत होते हे खोटे लिहीले

आहे. महीपत यांचे तिन्ही मुले, त्यांच्या बरोबर होती व देखभाल करत होते हे खोटे लिहीले आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. हे खरे नाही की, बाळकृष्ण राणे हे महीपत यांना शेतीमध्ये मदत करत होते हे खोटे लिहीले आहे. हे खरे नाही की, त्यामुळे महीपत यांनी बाळकृष्ण यांना दावा मिळकत देण्याचे ठरवले होते हा मजकूर खोटा लिहीला आहे. हे खरे नाही की, माझे वडील महीपत यांच्या हयातीत त्यांच्या सांगण्यावरुन दावा मिळकतीत एकटेच वहिवाट करत होते हे खोटे सांगत आहे. वडिलांना कोणीही हरकत नव्हते हे खोटे आहे किंवा कसे हे मला माहीत नाही.

१६. हे खरे नाही की, दावा मिळकतीत आमचा मांगर होता व काही हिश्यामध्ये आमच्या वडिलांनी घर क्र.१३५ बांधले होते हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाहीकी, १९८३ मध्ये माझ्या वडिलांनी घर बांधण्यासाठी, मांगर बांधण्यासाठी परवानगी घेतली होती हे दाखवणारा कागद माझ्याकडे नाही. सन १९८३ मध्ये दावा मिळकत महीपत यांच्या नावे होती किंवा कसे हे मला माहीती नाही. हे खरे नाही की, सरतपासातील परिच्छेद क्र.४ मधील मजकूर खोटा आहे. हे खरे नाही की, आमची तेथे विहीर व माडाची झाडे नाही. हे खरे नाही की, माझ्या वडिलांवर महीपतचा जीव होता हे मी खोटे सांगितले आहे. दावा मिळकतीत आमचा काही संबंध नाही किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. फेरफार क्र.३३७९ च्या आधारे आम्ही खोटे कागद तयार केले किंवा कसे हे मला माहीत नाही. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीची मालकी वहिवाट आहे किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. हे खरे नाही की, दाव्यात हजर केलेले कागद खोटे आहेत. हे खरे नाही की, खोटा दावा केला, खोटे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले व आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्विकृत

(श्रीमती एन.बी.घाटगे )

दि. ३१/०७/२०२४ — दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड